# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in


जा.क्र./गों.वि./म.वि.वि.वि./727 /२०२३ दि. 30/०५/२०२३

## परिपत्रक

विषय:- अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने कर्मचाऱ्याकडून वचनपत्र घेण्याबाबत.

संदर्भ:- १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२/११/२०२१

२. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक: संकीर्ण-२२०३/प्र.क्र.५५/ विशि-१ दि. ०६/०३/२०२३

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य यांना सुचित करण्यात येते की, संदर्भ क्र. १ च्या वित्त विभागाच्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/शासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था/अनुदानित संस्था/स्वायत्त संस्था यामधील कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रसंगी जसे की, वेतननिश्चिती/वेतनवाढ/अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या/प्रदानाच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रदान झाल्याची बाब भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अतिप्रदानित रक्कम शासनास परत करण्याचे वचनपत्र (Undertaking) संबंधित कर्मचाऱ्याकडून घेण्याबाबत सर्वकष सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन करुन महाविद्यालयाचे प्राचार्य व त्यांच्या अधिनस्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून तातडीने संदर्भीय परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यातील वचनपत्र (Undertaking) भरुन घ्यावे. तसेच सदर बाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास व विद्यापीठास सादर करावा.

सहपत्र:- संदर्भीय पत्र

मा. प्र-कुलगुरू यांच्या मान्यतेने,

(देवेंद्र एम. झाडे)
उपकुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित अनुदानित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव यांचे कार्यालय , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

4262 18/5/23

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. **vishi१-hted@mah.gov.in, popat.galgate@gov.in** दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२२०३/प्र.क्र.५५/विशि-१ दिनांक:-०६.०३.२०२३

**स्मरणपत्र क्र.१**

1069 18-05-23

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने कर्मचाऱ्याकडून वचनपत्र घेण्याबाबत.
संदर्भ:- १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि.२२.११.२०२१
२. शासन पत्र समक्रमांक दि.१६.०३.२०२२

वित्त विभागाने संदर्भाधीन शासन परिपत्रक दि.२२.११.२०२१ अन्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग/शासकीय कार्यालये/स्थानिक स्वराज्य संस्था/अनुदानित संस्था/स्वायत्त संस्था यामधील कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रसंगी जसे की, वेतननिश्चिती/वेतनवाढी/अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या/प्रदानाच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रदान झाल्याची बाब भविष्यात शासनाच्या निदर्शनास आल्यास अतिप्रदानित रक्कम शासनास परत करण्याचे वचनपत्र (Undertaking) संबंधित कर्मचाऱ्याकडून घेण्याबाबत सर्वकष सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. " उपरोक्त परिपत्रकात नमूद सूचना विचारात घेऊन सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्यातील वचनपत्र विद्यापीठातील व त्यांच्याशी संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांकडून भरून घेण्याबाबतच्या सूचना सर्व अकृषि विद्यापीठांना व महाविद्यालयांना देण्यात याव्यात. तसेच त्यानुषंगाने संबधित अकृषि विद्यापीठे व महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा" असे संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि मागविण्यात आलेला अहवाल तात्काळ सादर करावा, ही विनंती.

(सं. रा. उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- उचित कार्यवाहीसाठी,

१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
२. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, (संबंधित विद्यापीठामार्फत.)
३. निवडनस्ती (विशि-१)

अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने शासकीय
कर्मचाऱ्याकडून वचनपत्र घेण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

### शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०२१ / प्र. क्र. ५२ /सेवा-३

मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
तारीखः २२.११.२०२१

वाचा -

१) सिव्हील अपील क्रमांक ३५०० / २००६ (पंजाब व हरीयाणा उच्च न्यायालय व इतर विरुद्ध जगदेव सिंग ) यामधील मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचा दिनांक २९.०७.२०१६ चा अंतिम निर्णय

२) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक ३४८०/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१५.०९.२०२१ रोजी दिलेला न्यायनिर्णय

३) अतिरिक्त सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे पत्र क्रमांक जीपीएचसीएबीडी/उब्ल्यूपी/७६६५/२०२१, दि.२१.०९.२०२१

प्रस्तावना -

गट-अ, गट-ब, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाकाळामध्ये विविध प्रसंगी, त्यांना नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of their entitlements), शासकीय रकमांचे अतिप्रदान (Excess payment) होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. काही प्रसंगी अतिप्रदान झाल्याचे, भविष्यात आढळून आल्यास, अशा अतिप्रदानाची रक्कम, कर्मचारी शासनास परत करेल, अशा आशयाचे वचनपत्र (Undertaking), संबंधित शासकीय कर्मचाऱ्याकडून घेतले जाणे आवश्यक असतांना काही प्रकरणी वचनपत्र घेतले गेले नाही. परिणामी, अशा अतिप्रदानित रकमेची वसुली सुरु केल्यास कर्मचारी त्यास विरोध करत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

परिपत्रक -

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवा काळात होणाऱ्या अतिप्रदानाच्या रकमांची वसुली क्षमापित (Exemption from recovery of excess payment) करण्याबाबतच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक ३४८०/२०२० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१५.०९.२०२१ रोजी आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशातील परिच्छेद क्रमांक ९ व १० खालीलप्रमाणे आहे.

> "9. Before Parting with this matter, we deem it appropriate to record that we are coming across such cases practically everyday. Most of the cases are in connection with the various zilla parishads and State instrumentalities. In most of the cases, there is no undertaking executed by the beneficiary. We cannot ignore the fact that in such cases, the employee, though disentitled, has pocketed the tax payers amount.